दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक १९२ वा बुधवार दि.१५ जानेवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## सत्तेवर असलेल्यांनी सुसंवाद संपविला-शरद पवार

मुंबई : प्रतिनिधी-भाजपाचे ज्येष्ठ नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शिर्डीतील मेळाव्यात केलेल्या टीकेचा राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष शरद पवार यांनी आज जोरदार समाचार घेतला. राज्यात व देशपातळीवर भाजपाच्या अनेक ज्येष्ठ नेत्यांनी विविध पदावर काम केले. पण कोणावर स्वत:च्या राज्यातून तडीपार होण्याची वेळ आली नव्हती, असा पलटवार शरद पवार यांनी केला. पूर्वी सर्व पक्षात सुसंवाद होता. पण सध्या सत्तेवर असलेल्या लोकांनी पातळी सोडल्याचे दिसते. अमित शाह यांची टीका जिव्हारी लागली नाही, कारण नोंद घ्यावी अशी ती व्यक्ती नाही, असा टोलाही पवारांनी लगावला.

पक्ष पदाधिका-यांच्या शिर्डीत झालेल्या मेळाव्यात बोलताना अमित शाह यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर अत्यंत तिखट शब्दात टीका केली होती.१९७८ पासून शरद पवारांनी फोडाफोडीचे राजकारण केले. उद्धव ठाकरे यांनीही २०१९ ला दगाबाजी केली. महाराष्ट्रातील जनतेने या विधानसभा निवडणुकीत त्यांना धडा शिकवल्याची टीका अमित शहा यांनी केली होती. त्यावर शरद पवार यांनी आज पत्रकार परिषद घेऊन या टीकेला जोरदार प्रत्युत्तर दिले.

सरदार पटेल यांच्यापासून स्व. यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण अशा अनेक लोकांनी देशाच्या गृहमंत्रीपदावर काम केले. पदाची प्रतिष्ठा वाढवली. पुलोदच्या मंत्रिमंडळात हशू अडवाणी, उत्तमराव पाटील आदी नेते आपल्यासोबत होते. राज्यात व देशात त्यांनी उत्तम काम केले. पण त्यातील कोणाला आपल्या राज्यातून तडीपार व्हावे लागले नव्हते, असा टोला पवार यांनी लगावला. १९७८ साली मी राज्याचा मुख्यमंत्री होतो, हे गृहस्थ तेव्हा कुठे होते माहिती नाही. थोडी माहिती घेऊन टीका केली तर बरे होईल, असा सल्ला पवार यांनी दिला. पूर्वीच्या काळात विविध राजकीय पक्षात एक प्रकारचा सुसंवाद होता. अटलबिहारी वाजपेयी हे कर्तृत्वान नेते होते. भुजमध्ये भूकंप झाला, त्यावेळी वाजपेयी यांनी एक बैठक बोलावली. मी विरोधी पक्षात असतानाही वाजपेयी यांनी मला एका समितीवर नेमले होते. याची आठवण देताना पवार यांनी भाजपाच्या सध्याच्या राजकारणावर प्रखर टीका केली.

## सावलीपासून खूप काही शिकावे कधी लहान तर कधी मोठे होऊन जगावे..! समाजभूषण उत्तम तरकसे

पुणे:- तळेगाव दाभाडे पुणे येथील इंद्रायणी वैद्यकीय महाविद्यालय मधील फार्मसी सभागृहात ललित कला फाउंडेशन व कवितेचे घर यांचे द्वारा आयोजित कवितेवर बोलू काही व उर्दू मराठी गझल संमेलन तसेच गझल मैफिल ऐ सुखन समारंभाचे अध्यक्ष डॉक्टर संभाजी मलघे (प्रचार्य इंद्रायणी महाविद्यालय तळेगाव दाभाडे) तसेच प्रमुख अतिथी श्री रोहिदास पोटे (गझलकार समीक्षक) प्रा. तुकाराम पाटील (ज्येष्ठ गजलकार) प्रा. सौ. अर्पणा महाजन (प्रसिद्ध लेखिका) यांचे उपस्थितीत मोठ्या दिमाखात पार पडला सदर कार्यक्रमात निमंत्रित साहित्यिक म्हणून समाजभूषण मा. श्री उत्तमराव दासू तरकसे असरढोहकर राज्य (शासनाच्या समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक विचारवंत) हे उपस्थित राहून त्यांनी आपल्या कवितेतून सावलीपासून खूप काही शिकावं .. कधी लहान तर कधी मोठे होऊन जगावे.. शेवटी रिकाम्या हाताने जावे .. म्हणून प्रत्येक नाते हृदयापासून जपावे...

असे आपल्या प्रबोधनात्मक कवितेतून उपस्थितीतंचे प्रबोधन व उत्तम मार्गदर्शन केले सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदिनी काळे प्रवीण इंगळे यांनी खूपच सुंदर सादरी करण केले तसेच कार्यक्रमाची प्रस्तावना मा. श्री दिलीप कारखानीस (ललित कला फाउंडेशनचे अध्यक्ष) यांनी मांडली व सदर कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित साहित्यिक प्रमुख पाहुणे अतिथी व प्रेक्षक वर्गांचे आभार सुद्धा श्री कारखानेस यांनी व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली



## राष्ट्रीय मार्गात सर्व्हिस रोड ,अतिरिक्त दुभाजका करिता खाजदर काळगे यांना निवेदन



लातूर :--- राष्ट्रीय राज्य प्राधिकरण कडून नागपूर ते रत्नागिरी ३६१ राज्य मार्ग शहरातून गेलेला गरुड चौक ते राजीव गांधी चौक ७ की.मी रस्ते विकास कामात गरूड चौक नांदेड रोडवर सर्व्हिस रोड नाही , दुभाजकाचे लांबचे अंतरा मुळे निर्माण झालेल्या नागरी समस्या सोडविण्याकरिता लातूर शहर पूर्व नागरी कृती समितीच्या शिष्टमंडळाने आज लातूर लोकसभेचे खाजदर श्री शिवाजीराव काळगे यांना प्रतक्ष भेटून सकारात्मक चर्चा करीत निवेदन दिले

निवेदनात सदरील रस्ते विकास कामातील त्रुटी मुळे वाहनचालकांना वाहन चालवताना कसरत करावी लागत आहे त्यात गरुड चौक ते कृषी कॉलेजपर्यंत १ किलोमीटर दुभाजकातुन महादेव नगर,प्रबुद्ध नगर,माऊली नगर,करीम नगर,भागात जाण्याकरिता रस्ता नसल्याने नागरिकांना नाईलाजास्तव चुकीच्या दिशेने रॉग साईडने वावर करावा लागत आहे चौकात कुठल्याच बाजूला गतिरोधक नसल्याने अपघाताच्या प्रमाणात वाढ झालेली असल्याने नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे शिवाय नांदेड रोडवर सर्व्हिस रस्ता नसल्याने समस्या निर्माण झालेल्या आहेत या समस्या सोडवण्यासाठी

-- महादेव नगर कडे जाणारा रस्ता भरून नव्याने विकसित करावा ,हाच पुढे जाणारा सर्वे नंबर ५१ मधून महादेव नगर कडे जाणारा बंद रस्ता खुला करण्यात यावा

--- शिवरत्न जिवाजी महाले चौकात अपघात नियंत्रणाकरिता चौकाचे पूर्ववत सुशोभीकरण करून पोलीस मदत केंद्र उभारावे

--- बाभळगाव रोडवरून गरुड चौकात आलेला जास्तीचा दुभाजक १० फुटाणे कमी करावा

, --- वाहनांच्या गती नियंत्रनाकारीता चारही बाजूने गतिरोधक बसवावेत

--- परंडेकर पेट्रोल पंप समोरून रहदरीकरिता दुभाजकातुन मार्ग मोकळा करावं

--- गरुड चौक ते राजीव गांधी चौक मार्गावरील सर्व्हिस रोडवर अतिक्रमण झाल्याने नाविलाजास्तव रोड लगतच्या नागरिकांना मुख्य रस्त्यावर वाहन चालवावे लागतात ते धोक्याचे असल्याने ---सर्व्हिस रोडवरील अतिक्रमण तात्काळ काढण्याच्या सह नांदेड रोडवर सर्व्हिस रोड करावा या मागणीच्या निवेदन देण्यात आले या निवेदनावर लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे,अमोल गायकवाड, सुरेश संगापुडे,कावेरी विभूते,दत्ता जाधव,दीपमाला तुपकर, नंदकिशोर गंगणे, धीरज कश्यप, भगवेश्वर धनगर ,इत्यादींच्या स्वाक्षऱ्या होत्या

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतरण दिनानिमित्त महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले




लातूर :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतरण दिनाचे औचित्य साधून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क,लातूर येथे महामानव बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. समता व सामाजिक न्यायाचे प्रतिक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तारासाठीच्या लढ्याला महाराष्ट्राच्या इतिहासात वेगळे महत्त्व आहे.अस्मितेचा हा लढा निर्धाराने लढणाऱ्या,या लढ्यात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शहीदांना अभिवादन करून या लढ्यात सहभागी झालेले चळवळतील पॅंथरनेते श्रीहरी कांबळे,अशोक काबंळे, बसवंतअप्पा उबाळे,प्रा.अनंत लांडगे,मोहन माने,बाबासाहेब गायकवाड,चद्रकांतदादा चिकटे, डी.टी.सुर्यवंशी,माजीनगरध्यक्ष लक्ष्मण कांबळे,विश्वनाथ श्रृंगारे यांच्या सह चळवळीत योगदान देणाऱ्या अनेक मान्यवरांचा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक राहूल कांबळे,माजी नगरसेवक नवनाथ आल्टे,राष्ट्रवादी यूवक काँग्रेस लातूर शहर जिल्हाअध्यक्ष लाला सुरवसे,अल्पसंख्याक शहर जिल्हाध्यक्ष जहांगीर शेख, युवक वि.अध्यक्ष प्रविण पाटील,संतोष उपाडे, कामगार जिल्हाध्यक्ष सोहम गायकवाड,अमन सुरवसे, प्रदेश सरचिटणीस विशाल आवडे,सेवादल कार्याध्यक्ष पोटभरे, संविधान स्तंभ कृती समितीचे संजय सोनकांबळे,डी.उमाकांत यांसह इतर मान्यवर उपस्थित होते.

## शेतकऱ्याच्या समस्यांचे काय अतिवृष्टीग्रस्त शेतकरी अनुदानापासून वंचित कर्मचाऱ्यांमुळे शेतकार्याची फजिती



किनवट/शेख शौकत :-किनवट तालुक्यातील अनेक शेतकरी अनुदानापासून वंचित सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीत शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर शासनाने नुकसान भरपाईपोटी अनुदान वर्ग केले. परंतू तलाठी स्तरावर लापरवाही झाल्याने डीबीटी प्रणालीद्वारे आजही शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा झालेली नाही. तलाठी, ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडे बोट दाखवतात, तर ग्रामपंचायत अधिकारी तलाठ्यांच्या चुकांकडे अंगुली निर्देश करतात. यांच्यातील सारीपाठामुळे आता ई- केवायसी आणि त्यांनी केलेल्या चुकांच्या दुरुस्ती करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली या चुकीला जबाबदार कोण ग्रामपंचायत अधिकारी की तलाठी हे प्रश्न विचारले जात आहे. सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीत बाधित शेतकऱ्यांच्या शेताचे पंचनामे करण्यात आलीत. अगदी अल्प शेतकऱ्यांची व्हीके नंबर प्राप्त झाली असून उर्वरीत बहूतांश शेतकरी आजही अनुदानापासून वंचित ठेवल्या जात आहे. शेतकऱ्यांनी माहीती अपलोड करुन व्हीके नंबर प्राप्त करुन घेण्यासाठी माहूरच्या तहसिलदारांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे .किनवटच्या तहसिलदारांनी लवकरात लवकर मार्ग मोकळा करावी अशी आशा शेतकरी करत आहे. शेतकऱ्यांनी तलाठ्यांकडे आवश्यक कागदपत्रे दिली होती. परंतू संबंधितांनी अनुदान लाभार्थी यादीत चुकीचे आधार नंबर लिहिल्याने शेतकरी व्हीकेस पात्र ठरत नाहीत. आता कर्मचाऱ्यांनी केलेल्या चुका शेतकऱ्यांनी दुरुस्त करण्याची वेळ आली आहे. तलाठी आणि ग्रामपंचायत अधिकारी यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे शेतकरी अनुदानापासून वंचित राहाण्याची भीती व्यक्त होत आहे.

## विद्यापीठ नामांतर लढा भिमसैनिकांचे स्फूलींग चेतविणारा.! - डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी

अहमदपूर / प्रतिनिधी :- मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा लढा हा स्वाभिमानाचा,अस्मितेचा लढा होता या लढ्यात भिमसैनिकांनी दाखवलेले धैर्य आणी प्रसंगी जीवाचे बलीदान देवून दिलेला निकराचा लढा हा ऐतिहासिक अशा स्वरूपाचा असून अन्याय अत्याचाराच्या विरोधात काम करणाऱ्यांसाठी हा लढा स्फूलींग चेतविणारा ठरला आहे असे प्रतिपादन युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले. शहरातील शहिद गौतम वाघमारे चौक येथे विद्यापीठ नामविस्तार दिन व अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते गोपीनाथराव जोंधळे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून रिपाई नेते अरूणभाऊ वाघंबर,माजी नगराध्यक्षा सरस्वतीबाई कांबळे,पत्रकार भिमराव कांबळे,मासूम शेख,बालाजी कांबळे, शिवनाथ कांबळे,चॉद सौदागर,जाबेर शेख, भैय्यासाहेब भालेराव,बाबूभाई शेख,किरण वाघमारे आदींची प्रमुख उपस्थिती होती. सुरूवातीला युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी




यांच्या हस्ते निळाध्वज लावण्यात आला.तसेच सामूहिक त्री-शरण पंचशिलाचे पठण करण्यात आले. पुढे बोलताना डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी म्हणाले की,तब्बल सोळा वर्षाचा निकराचा लढा भिमसैनिकांनी देवून प्रसंगी जीवाचे बलीदान दिले तेंव्हा कूठे विद्यापीठाला बाबासाहेब आंबेडकर यांचा नांव देण्यात आले.सिम्बॉल ऑफ नॉलेज म्हणून गौरवीत व्यक्तीचे नांव विद्यापीठाला देण्यासाठी केवळ जातीचा अडसर होता हे वारंवार सिध्द झाले.यातून प्रस्थापितांची जातीय मानसिकता दिसून येते.पण आज देशभरात चार पाच डझन विद्यापीठ आणी संस्थांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नांव आहे.बाबासाहेबांच्या नावामूळे विद्यापीठांचा आणी संस्थांचा गौरव वाढला आहे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक स्वागताध्यक्ष दयानंदराव वाघमारे यांनी केले.तर आभार संविधान कदम यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सचिन बानाटे,आकाश पवार,संविधान कदम, आनंद सोनकांबळे, बाबासाहेब सोनकांबळे, रमाकांत कदम,प्रकाश वाघमारे,बालाजी वाघमारे, ऊत्तम रायभोळे,राजुगुळवे,अमोलमोरे,दिलीपसोनकांबळे,मिलिंद कदम, राहुल वाघमारे,रितेश रायभोळे,आकाश वाघमारे, बॉस वाघमारे,निलेश लामतुरे, रोहन गायकवाड,जय गुळवे,यशवंत वाघमारे,अभय गायकवाड,रोहीत दहीकांबळे, निलेश रायभोळे,विशाल ससाने,स्वर्णकेत कांबळे आदींनी पुढाकार घेतला.

## संपादकीय....

# भारत अफगाण मजबूत संबंध

भारताला मानवतावादी मूल्यांवर भर द्यावयाचा आहे आणि राजकीय लाभापेक्षाही दीर्घकालीन मानवी संबंध सुधारण्याचा भारताने नेहमीच आग्रह धरला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर दुबईत झालेली भारत-अफगाण बोलणी दुहेरी हिताच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

अफगाणिस्तानातील पारंपरिक आणि ऐतिहासिक मैत्रीला नव्या संदर्भात नवा उजाळा मिळत आहे. प्राचीन काळात गांधार देश म्हणून ओळखला जाणारा अफगाणिस्तान आता भारताच्या दृष्टीने बफर स्टेट म्हणून महत्त्वाचा आहे. विशेषतः भारताशी शत्रुत्व घेणार्या पाकिस्तानपासून बचाव करण्यासाठी अफगाणिस्तान नेहमीच तटस्थ राहून आपल्या बाजूने भूमिका घेत आला आहे. अलीकडे तालिबान सरकार आणि पाकिस्तानातील तणाव वाढले आहेत. तालिबान सरकार पाकिस्तानच्या कृष्णकृत्यावर प्रकाश टाकून त्याच्यावर हल्लेही करीत आहे. शिवाय तालिबान सरकारने भारतविरोधात दहशतवादी गटांना आपल्या भूमीचा वापर करू देणार नाही याची हमी दिली आहे. त्यामुळे जम्मू-काश्मीर भागातील दहशतवादी उपद्व्याप थोडेसे कमी झाले आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर दुबईमध्ये झालेल्या भारत-अफगाणिस्तान मैत्री संवादाचे विशेष महत्त्व आहे.

भारत आणि अफगाणिस्तान या दोहोंनाही समान पातळीवर मित्र मानणार्या देशांमध्ये दुबईचे अग्रस्थान आहे. त्यामुळे उभयतांच्या चर्चेसाठी दुबई या योग्य स्थानाची निवड करण्यात आली. यापूर्वी निम्न सचिव स्तरावर बोलणी होत असत. पण प्रथमच यावेळी उच्च सचिव दर्जावर ही बोलणी झाली आहेत. भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री आणि अफगाणिस्तानचे कार्यवाहक परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्ताकी यांच्यात ही बोलणी झाली. या बोलणीला विशेष महत्त्व आहे. एस. जयशंकर यांनी म्हटल्याप्रमाणे, ही बोलणी कमी राजकीय आणि अधिक मानवतावादी आहेत. अफगाणिस्तान सध्या संकटात सापडलेला आहे. नुकताच भूकंपाच्या तडाख्यातून वाचल्यानंतर त्याला भारताने भरघोस मदत केली. शिवाय ५० मेट्रिक टन गहू, पोलिओ लस, औषधे यांचा हप्ताही भारताने अफगाणिस्तानला दिला. ही मदत मानवी पातळीवर आहे. माणूस म्हणून अफगाणिस्तानातील दुःखी, कष्टी प्रजेला सहाय्य करणे आपले कर्तव्य आहे. कारण एके काळचे अफगाण हे भारतीय रक्ताचे, वंशाचे समूह आहेत. त्यामुळे ज्या ज्यावेळी अफगाणिस्तान संकटात सापडतो, त्यावेळी भारत धावून जात असतो. यावेळी सुद्धा भारताने अफगाणिस्तानला मदतीचा हात दिला आहे ही गोष्ट विशेषत्वाने लक्षात घेतली पाहिजे. अफगाणिस्तानात महागाई आणि टंचाई तसेच दुष्काळाने कहर केला होता. त्यावेळी भारताने अफगाणिस्तानला सातत्याने अन्नधान्याचा पुरवठा केला आणि गव्हाचा पुरवठा केला. त्यामुळे अफगाणिस्तानमधील गोरगरीब लोकांना दोनवेळा सुखाचे जेवण प्राप्त होऊ शकले. त्यामुळे प्रत्येक अफगाण माणूस भारत आणि भारतीय संस्कृतीचा ऋणी आहे. शिवाय आता अफगाणिस्तानातील लोकांना भारतामध्ये आरोग्य सुविधा देण्यात येणार आहेत. तेथील रुग्णांना भारतात आरोग्य सेवा आणि मुला-मुलींना भारतामध्ये येऊन शिक्षण घेण्याची संधीही मिळणार आहे. हीसुद्धा आणखी एक जमेची बाजू आहे.

अफगाणिस्तानचे असे म्हणणे आहे की, रावळपिंडीपासून काबूलपर्यंतचा एक पट्टा हा अफगाण लोकांच्या दाट वस्तीचा पट्टा आहे. या भागावर फार पूर्वीपासून अफगाण लोकांचे वर्चस्व आहे. विशेषतः काबूलपासून खैबरखिंडीपर्यंतच्या भागावर त्या चिंचोळी पट्टीवर आपले प्रभुत्व आहे हे सिद्ध करण्याचा प्रयत्न अफगाणिस्तान अनेकवेळा करीत असतो. पण पाकिस्तान त्याचा हा दावा नाकारतो. त्यामुळे उभय देशांत संघर्ष होतो. तेथील अफगाण क्रांतिकारकांना हुसकावून लावणे, त्यांच्यावर हल्ले करणे, त्यांच्यावर लष्करी कारवाया करणे अशा प्रकारच्या अनेक घटना पाकिस्तानकडून होतात. पाकची अफगाणविरुद्धची आक्रमकता जशी वाढत आहे, तशी भूराजनैतिक दृष्टीने भारताशी जवळीक होणे ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. गेल्या काही वर्षांमध्ये एकीकडे पाकच्या डोक्यावर बलुचिस्तानची टांगती तलवार आहे तर दुसरीकडे अफगाण बंडखोरही पाकिस्तानविरोधात कारवाया करीत आहेत. त्यामुळे पाकिस्तान व अफगाणिस्तानमधील संघर्ष वाढला आहे. जणू उभयतांमध्ये विळ्या-भोपळ्याचे सख्य आहे. या पार्श्वभूमीवर आता अफगाणिस्तानला पाकिस्तानशी अधिक संघर्ष करण्यासाठी भारतासारख्या सच्च्या मित्राचे सहाय्य हवे आहे. पण भारताने युद्धापेक्षाही शांतता व विकासावर अधिक भर दिला आहे. भारताच्या मते, सारे प्रश्न सामोपचाराने सोडविले पाहिजेत आणि विकासाच्या योजनांवर प्रथम भर दिला पाहिजे. अफगाणिस्तानच्या सामुदायिक विकासासाठी भारताचा प्रयत्न आहे. अफगाण देशातील लोकांच्या विकासाचे अनेक प्रकल्प भारताच्या मदतीने पुढे गतिमान होत आहेत. एक काळ असा होता, हमीद करझाई यांच्या काळात भारताने लोया जिरगा सभागृह बाधूंन दिले होते. आता तालिबान काळातसुद्धा अनेक अफगाण तरुण भारतात शिकण्यासाठी उत्सुक आहेत. सुरुवातीच्या काळात अफगाणिस्तानमधील तालिबान सरकारला भारताने कोणतेही सहकार्य केले नाही. किंबहुना आजपर्यंत त्याला राजकीय मान्यताही दिलेली नाही. परंतु मुत्सद्दी पातळीवरील बोलणी मात्र सुरू आहेत आणि आता काही प्रतिनिधी काबूलमध्ये जाऊन तेथील भारतीय दूतावासाचे कामकाज सुरू करण्याच्या तयारीत आहेत. या पार्श्वभूमीवर अफगाणिस्तान आणि भारत या उभय देशातील संबंध आता नव्याने खुलत आहेत, फुलत आहेत आणि ते समान शत्रू या समीकरणावर आधारून अधिक नवी गती घेत आहेत.

# संक्रात सुर्याच्या भासमान भ्रमणावर





पृथ्वीच्या परिभ्रमणामुळे सूर्याच्या मागील अवकाशाची पार्श्वभूमी बदलते आणि सूर्य वेगवेगळ्या नक्षत्रांमधून जात असल्याचे दिसते. संपूर्ण चक्र १२ भागांमध्ये विभागले गेले आहे. ज्याला राशिचक्र म्हणून ओळखले जाते आणि ज्या दिवशी सूर्य धनू राशीतून मकर राशीत प्रवेश करतो, त्या दिवशी मकर संक्रमण होते.

सूर्याभोवती प्रदक्षिणा घालताना, सूर्याच्या पार्श्वभूमीवर राशिचक्र बदलत असताना पृथ्वीच्या अक्षाचा कल सारखाच राहतो. परंतु, त्यामुळे एक गोलार्ध सूर्यासमोर सहा महिने आणि दुसरा सहा महिने सूर्याच्या मागे राहतो. यामुळे पृथ्वीवरील सूर्यकिरणांचा कोन सतत बदलत राहतो आणि सूर्य सहा महिने उत्तरेकडे आणि सहा महिने दक्षिणेकडे फिरल्याचा आभास देतो. यालाच भौगोलिक भाषेत उत्तरायण आणि दक्षिणायन म्हणतात. मकर संक्रांतीत सूर्याचे दक्षिणायन संपून उत्तरायण सुरू होते. कारण सूर्य धनू राशीतून मकर राशीत प्रवेश करतो. मकर संक्रांतीनंतर, उत्तर गोलार्धात सूर्य उत्तरेकडे जाऊ लागतो आणि हिवाळा कमी होऊ लागतो. भारतासह उत्तर गोलार्धात उन्हाळा वाढू लागतो. हे २१ जूनपर्यंत होते, त्यानंतर सूर्याचे दक्षिणायन सुरू होते.

मकर संक्रांतीनंतर दिवस मोठे होतात आणि रात्री लहान होतात. उत्तर गोलार्धात १४-१५ जानेवारीपर्यंत सूर्यास्ताची वेळ हळूहळू पुढे सरकते. त्यानंतर २१ मार्च ही तारीख येते, जेव्हा दिवस आणि रात्र अगदी समान असतात त्याला इक्विनॉक्स म्हणतात. याचा अर्थ सूर्य जवळजवळ उत्तर गोलार्धाच्या मध्यभागी असतो. सूर्यास्ताच्या वेळेत हळूहळू बदल होणे म्हणजे हिवाळा कमी होतो. त्यानंतर उन्हाळा वाढायला सुरुवात होते. कारण सूर्य उत्तर गोलार्धात जास्त काळ राहणार असतो. पृथ्वी सूर्याभोवती फिरते हे सर्वज्ञात आहे. पण पृथ्वीवरून पाहताना पृथ्वीभोवती सूर्य फिरतो असे भासते. याला सूर्याचे भासमान भ्रमण असे म्हणतात. सूर्य उगवताना ज्या तारकासमूहांच्या पार्श्वभूमीवर तो दिसतो ती जागाही रोज बदलते. एक-दोन दिवसांमध्ये सूर्याच्या स्थानातील बदल फार लक्षणीय नसतो. पण महिनाभरात ही जागा अगदी निश्चितपणे बदललेली दिसते. आणि वर्षभरानंतर सूर्य पुन्हा नेमक्या त्याच तारकासमूहाच्या पार्श्वभूमीवर नेमक्या त्याच जागी दिसू लागतो. या तारखासमूहांना त्यांच्या आकारावरून जी नावे दिली गेली, त्यांनाच आपण राशी म्हणतो. थोडक्यात, वर्षभरात सूर्य या विविध तारकासमूहांमधून भ्रमण करतो आहे, असे भासते म्हणजेच सूर्य विविध राशीमधून प्रवास करत असतो. वर्षभरात सूर्याच्या या भासमान भ्रमणाचा जो मार्ग त्याला 'क्रांतिवृत्त' असे म्हणतात.

वैज्ञानिकदृष्ट्या बोलायचे झाले तर सूर्याच्या उत्तरायणाची सुरुवात खरे तर २१ डिसेंबरला होते, जेव्हा सूर्य दक्षिणायन संपवून उत्तरेकडे सरकायला लागतो. पण भारत आणि उत्तर ध्रुवाच्या दरम्यान असलेल्या देशांमध्ये हा प्रभाव मकर संक्रांतीच्या दिवशी अधिक प्रभावी मानला जातो. ती तारीख १४ किंवा १५ जानेवारी असते. सध्या हा फरक २४ दिवसांचा आहे. तसेच दर वर्षीचा नऊ मिनिटे दहा सेकंद हा काळ साठत साठत जाऊन दर १५७ वर्षांनी मकर संक्रांतीचा दिवस आणखी एक दिवसाने पुढे जातो. दर १५०० वर्षांनी पृथ्वीच्या परिभ्रमणाच्या अक्षात होणार्या बदलामुळे हा फरक दिसून येतो. आजपासून १२०० वर्षांनंतर ही तारीख बदलून फेब्रुवारी महिन्यात येईल. २००१ ते २००७ पर्यंत १४ जानेवारीला मकर संक्रांत येत होती. पण २००८ मध्ये १४ जानेवारीला १२ वा. ७ मिनिटांनी संक्रांत आली, त्यामुळे संक्रांतीचा सण त्याच वर्षी १५ जानेवारीला झाला. दरवर्षी ही वेळ ६ तास ९ मिनिटांनी पुढे सरकते आणि चार वर्षांत ती २४ तास ३६ मिनिटांनी पुढे सरकते. पण, लीप वर्षामुळे ती २४ तासांनी मागे सरकते म्हणजेच दर चार वर्षांनी ती ३६ मिनिटांनी पुढे सरकते. काही वर्षांत संक्रांतीची तारीख पुढे सरकते. सामान्यतः भारतातील सर्व सण हे चंद्राच्या चक्रानुसार असतात. त्यामुळे इंग्रजी दिनदर्शिकेनुसार त्यांच्या तारखा दरवर्षी बदलतात. म्हणूनच होळी, दिवाळीसारखे सण वेगवेगळ्या तारखांना येतात. परंतु मकर संक्रांती हा एकमेव सण आहे, जो सूर्याच्या भासमान भ्रमणावर

# नवी रणधूमाळी

भाजप हा पक्ष वेळोवेळी भाकरी फिरवतो आणि चुका सुधारून तो वाटचाल करताना दिसतो. त्यामुळे दीर्घ काळाने का होईना, या पक्षाला मिळणारे यश या धोरणात दिसते. २०२४च्या लोकसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून भाजपने संघटनात्मक बदलांना प्रारंभ केला. उदाहरणार्थ, तेलंगणातील विधानसभा निवडणुकीपूर्वी तेथे केंद्रीय मंत्री जी. किशन रेड्डी यांची प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांनी विधानसभा निवडणुकीत पक्षाची ताकद वाढवून दाखवली. पंजाबमधील भाजपची पक्ष संघटना कमजोर असल्यामुळे काँग्रेसमधून आयात केलेले नेते सुनील जाखड यांना प्रदेशाध्यक्षपदी बसवले गेले. लोकसभा निवडणुकांपूर्वी कोणत्या नेत्याला काय रुचेल- वाटेल याचा विचार न करता, भाकरी फिरवणे भाजपने जरुरीचे मानले. बदल न केल्यास संघटनेत सुस्तपणा येत असतो. सत्ता मिळवायची असेल, तर सतत सुधारणा करण्याचे प्रयत्न भाजपने जारी ठेवलेले दिसतात. महाराष्ट्रातही 'एक नेता एक पद' हा नियम असल्यामुळे संघटनेची सूत्रे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे नजीकच्या काळात कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे सोपवतील. लोकसभा निवडणुकीत राज्यात महाविकास आघाडीला घवघवीत यश मिळाले. पण त्यामुळे आपण गाफील राहिलो. विधानसभा निवडणुका हातचा मळ असल्याचा आम्ही समज केला. त्यामुळे दारुण पराभव झाला, अशी मीमांसा राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी केली आहे. ती करताना, संघाच्या कार्यकर्त्यांनी ही निवडणूक हातात घेतली होती. घरोघरी जाऊन त्यांनी हिंदुत्वाचा प्रचार केला.

मतदारांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांनी यश मिळवले, असे म्हटले असून राजकारणाचा विचार करताना त्याची नोंद घ्यावी लागेल. लोकसभा निवडणुकीतील पराभवामुळे खचून न जाता भाजपची पक्ष संघटना जोरदारपणे कामाला लागली. महाविकास आघाडी आणि महायुतीच्या मतांमध्ये अत्यल्प फरक असून निराश होण्याचे कारण नाही, असे आवाहन तेव्हा उपमुख्यमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. त्यानंतर लोकसभेच्या वेळी ज्या ज्या त्रुटी राहिल्या, त्या दूर करून बूथ पातळीवरील कार्यकर्त्यांनी मतदारांपर्यंत जाऊन पक्ष व सरकारने केलेली कामे पोहोचवली. त्यामुळे महायुतीचा व भाजपचा विधनसभेत दणदणीत विजय झाला. आता विधानसभेतील यशामुळे भाजपमध्ये शैथिल्य आलेले दिसत नाही. उलट आता पक्षाचा मुख्यमंत्री बनल्यामुळे नेते व कार्यकर्त्यांत चैतन्य आले आहे. महाराष्ट्रात दीड कोटी सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट ठेवले असून, १ कोटी २८ लाखांचा टप्पा पक्षाने गाठला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या काही निवडणुकांपासून स्वबळावर वाटचाल करण्याचे भाजपचे संकेत आहेत. २०२४च्या निवडणुका महायुतीत, तर २०२९च्या निवडणुका स्वबळावर लढणार असल्याची घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गेल्या वर्षी पक्ष पदाधिकार्यांच्या बैठकीत केलीच होती. लोकसभेत मिळालेल्या मतांपेक्षा किमान २०-२५ लाख मते अधिक मिळाली, म्हणजे प्रत्येक मतदान केंद्राच्या क्षेत्रात २० ते २५ मतदार भाजपने वाढवल्यास यश मिळेल, असे नियोजन करण्यात आले होते.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि २०२९ मधील लोकसभा-विधानसभा निवडणुकांच्या दृष्टीने भाजपने आता बळ वाढवण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. भाजपमध्ये विजयाचा उन्माद येणार नाही, असे प्रतिपादन प्रदेशाध्यक्षांनी केले आहे. पक्षाच्या शिर्डीतील मेळाव्यात भाषण करताना शहा यांनी, जनतेशी जास्तीत जास्त संपर्क ठेवा आणि सरकारच्या प्रतिमेला धक्का लागेल अशी कृत्ये करू नका, असे थेटपणे मंत्र्यांना बजावले आहे. ग्रामपंचायतींपासून ते संसदेपर्यंत भाजपच्या विजयाचा भगवा झेंडा फडकत राहिला पाहिजे. महाराष्ट्रात भाजपची इतकी बलशाली उभारणी करा, की पुन्हा कोणाचीही दगाबाजी करण्याची हिंमत होणार नाही, असे खणखणीत आवाहन शहा यांनी केले आहे. मात्र आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये रालोआला, म्हणजेच महायुतीला विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले, हे सूचक आहे. एकीकडे महाविकास आघाडीत जाहीरपणे तिन्ही पक्ष एकमेकांवर टीका करत असतानाच, महायुतीतील एकता अभंग असल्याचा संदेश त्यांना द्यायचा असावा. याचे नेमके उलट चित्र महाविकास आघाडीत आहे. शिवसेना आगामी निवडणुका स्वबळावर लढणार असल्याची घोषणा खासदार संजय राऊत यांनी केली असून, त्यामुळे काँग्रेस पक्ष नाराज आहे. तर राष्ट्रवादीचे खासदार अमोल कोल्हे यांनी जाहीरपणे ठाकरे यांची शिवसेना तसेच काँग्रेसवर टीकास्त्र सोडले आहे. महाविकास आघाडी आपापसांतच लढत असताना, शहा यांनी मात्र शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना लक्ष्य केले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे कारण त्यामागे आहे.

पवार यांनी १९७८ पासून दगाबाजीचे राजकारण सुरू केले; तर भाजप आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी उद्धव ठाकरे यांनी द्रोह केला. मतदारांनी त्यांना जागा दाखवून दिली, असा हल्लाबोल शहा यांनी यावेळी केला; तर श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र ज्यांना समजला नाही, त्यांची हालत काय झाली, हे आपण विधानसभा निवडणुकीत पाहिले, अशी सूचक टीका मुख्यमंत्री फडणवीस यांनी विरोधकांवर केली आहे. शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि उबाठा सेना नजीकच्या भविष्यकाळात भाजपसोबत जाईल, अशा चर्चांना वेग येत असतानाच, शहा यांनी मात्र या पक्षांना जमिनीत गाडण्याची भाषा केली आहे, हे राजकीय निरीक्षकांनी लक्षात घेतले पाहिजे. एकेकाळी महाराष्ट्रात काँग्रेसचाच वरचष्मा असताना भाजप कुठेच नव्हता. गेल्या १० वर्षांत मात्र महाराष्ट्राच्या जनतेने विधानसभेत भाजपला सलग तीनदा शंभरपेक्षा जास्त जागा दिल्या आहेत. भाजप आणखी यश मिळवू पाहत आहे. उलट निवडणुकीत नापास झाल्याबरोबर विरोधकांना नैराश्य आल्याचे चित्र आहे. राज्यातील विरोधी पक्षांनीही पुनश्च हरिओम म्हणून कामाला लागावे लागेल. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे रणशिंग भाजपने फुंकले आहेच, त्यांचा प्रबळ विरोधक काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना (उबाठा) हाच आहे. राज्याच्या राजकारणात येत्या काही दिवसांत ही नवी रणधुमाळी पाहायला मिळेल.

# आंबेडकरी चळवळीसाठी सर्वस्व अर्पण करा.

२०२४ ची लोकसभा निवडणूक संपली.अनेक पक्ष आणि संघटनांनी निवडणुकीत सहभाग घेतला.काही पक्ष, संघटना फक्त निवडणूक जिंकण्यासाठी एक दुसऱ्यांच्या मदतीसाठी आधार बनून लढल्यात.कारण त्यांच्यात वैचारिक भेदभाव नव्हता.सत्तेत जाण्यासाठी काही पण एवढाच एक हेतू होता.अनेकांचा हेतू सफल झाला.या प्रत्येकाने लोकसभेची निवडणूक जिंकली. काही पक्षांनी संघटनांनी नुसताच दुसऱ्यांचा प्रचार केला. त्यावेळी कोणतीही अट,ठेवली गेली नाही.बिन भांडवली मदत करणाऱ्यांचे ही काही वेगळे मनसुबे होते.भविष्यासाठी काही राखीव डावपेच होते.हे सारे राजकारणात स्थिरावलेले आणि कुठल्याही समाजाचे प्रतिनिधित्व नसलेले लोक आहेत.यातील अनेकांनी राजकारण हाच एकमेव व्यवसाय म्हणून किंवा अर्थार्जनाचं साधन म्हणून राजकारणाकडे पाहिलं.यांना कोणीही जा आणि आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा की आम्हाला या देशाची शासनकर्ती जमात बनायचे आहे असं सांगितलं नाही.तरीही हे सारेच शासनकर्ते झालेत.याउलट बौद्धांना किंवा महारांना बाबासाहेबांनी शासनकर्ती जमात बनण्याचे स्वप्न दिले. ते ७४ वर्षांमध्ये कधीच आंबेडकर वाद्यांना पूर्ण करता आले नाही.हा समाज शिकला सुटा बुटात आलाश्र.त्यामुळेच की काय संघटना आणि संघर्ष हे दोन्ही शब्द,त्या शब्दांची व्याप्ती हा समाज विसरला.धोतर पंचा आणि सुटा बुटापर्यंतचा प्रवास म्हणजे प्रगती, असं या समाजाला कदाचित वाटत असावं. म्हणूनच सामाजिक धार्मिक आणि राजकीय अशा तीनही क्षेत्रात हा समाज मागे पडलेला दिसतोय.६ डिसेंबर,१४ ऑक्टोबर,१४ एप्रिल ला विहारं उघडतात.काही ठिकाणी विहारात चकाकतात.अनेक ठिकाणी रंगरंगोटीचा पत्ताच नसतो. पण ह्या तारखांना वर्गणी,डीजे,सामूहिक जेवण,नाच गाणी यात कार्यक्रम गुंडाळला जातो.त्याचे काही फोटो व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित होतात.अनेक लोक बाबासाहेबांना बापाचा बाप म्हणतात.स्वतःचा फोटो बाबासाहेबांसोबत बरोबरीने लावतात.तिथे आंबेडकरवाद संपतो.परत त्याच तारखांच्या प्रतीक्षेत मग हा समाज वर्षभर झोपा काढतो. कारण सामाजिक राजकीय आणि धार्मिक क्रांतीचं काम अशा नवश्या गौशांच्या दृष्टीने संपलेलं असतं. त्यामुळे बाबासाहेबांच्या कल्पनेतील स्वाभिमानी बाणेदार आणि लढाऊ समाज आजपर्यंत निर्माण होऊ शकला नाही. अनेकदा आमच्या समाज प्रगत आहे वैचारिक आहे वगैरे आपण ऐकतो.काही काळानपुरतं मलाही तसंच वाटत होतं.पण मागील काही वर्षांपासून वर्षांचा अनुभव आणि निरीक्षण आपण वैचारिक किंवा प्रगल्भ आहोत ह्या केवळ अफवा वाटतात. कारण माणूस विचारांनी प्रगत झाला असेल तर तो त्याचं स्वतःचं मत तयार करतो. त्याच्याकडे एक निर्णय क्षमता असते. ती निर्णय क्षमता कथित आंबेडकर वाद्यांमध्ये दिसून येत नाही. त्यामुळे सामाजिक, राजकीय आणि धार्मिक पातळीवर आंबेडकरी समाजाची पीछेहाट होताना दिसून येते. समाजात भाडखाउंची संख्या वाढत चाललीय. राजकारण ही सर्व समस्यांची किल्ली आहे असे बाबासाहेब म्हणाले होते. त्यामुळेच त्यांनी शासनकर्ती जमात बनण्याचे स्वप्न दिले. पण बाबासाहेबांचे हे स्वप्न वास्तव रूप धारण करू शकले नाही . प्रत्येक घरात नेता निर्माण झाला. आणि साधा नेता नाही तर राष्ट्रीय अध्यक्ष झाला. बरे राष्ट्रीय अध्यक्ष झाला तरी काही हरकत नाही. तो गुलाम झाला ही खरी शोकांतिका आहे.याचं खरं दुःख आहे. सदैव समाज विक्रीला बांधून दुसऱ्यांची हुजरेगिरी करणारा नेता निर्माण झाला. लोकसभेत आणि विधानसभेत कुठलेही स्थान मिळाले नाही तरी भाजपच्या विजय उत्सवात हे रिपब्लिकन नेते हात उंचावून आनंद साजरा करतात तेव्हा पायातील चप्पल यांच्या मुस्काटात मारावी इतका टोकाचा राग येतो. आणि प्रत्येक प्रामाणिक आंबेडकर वाद्यांना असा राग येत असावा. भाजपच्या विजयासाठी प्रयत्न करणारे योगदान देणारे हे नेते आहेत , तसे काँग्रेस सेनेला मते मागणारे ही नेते, कार्यकर्ते आहेत. मग आंबेडकरी राजकारणासाठी कुणी काम करायचे? जेम्स वॅट वाफेच्या इंजिनचा शोध लावताना, प्रयोग करताना बघ्यांची गर्दी असायची. जेम्सचा शोध कधीही पूर्ण होणार नाही. इंजिन कधीही चालू होणार नाही असा एकच आवाज या गर्दीतून यायचा. पण जेम्स ला यश आले. इंजिन सुरू झालं. मग हीच माणसं आता इंजिन कधीच बंद होणार नाही असे ओरडू लागले .हे सर्व नकारात्मक बोलणारे होते. आंबेडकरी राजकारणाकडेही प्रायोगिक दृष्टीने पाहणारे लोक आहेत. या लोकांनाआंबेडकरी राजकारण कधीही यशस्वी होणार नाही असंच काहीसं वाटतय.आंबेडकरी राजकीय चळवळीत असाच नकार पेरण्याचं काम सध्या सुरू आहे.

लोकसभेच्या निवडणुकीत संविधान बदलाचा मुद्दा पुढे केला.आणि भाजपच्या विरोधात काँग्रेसच्या सत्तेसाठी रिपब्लिकन जनतेला भावनिक करून मते मागितली.आणि वंचित ची मते घटविली.काँग्रेसच्या हाडूकावर पोट भरणाऱ्यांनी प्रचाराची वेगळीच शकल लढवली. भाजप संविधान संपवणार आहे..वगैरे आपला पक्ष सत्तेत येत नाही म्हणून दुसऱ्या पक्षाला मते मागायला, द्यायला सांगणारे कार्यकर्ते काँग्रेस सेनेने निर्माण केले.त्याही पुढे जाऊन तुम्ही वंचितला मते दिली तर ती मते भाजपला जातात.असा अक्कलशून्य प्रचार केला.आणि काँग्रेससाठी मते मागितले २०२४ पासून भाजप सत्तेला जनता कंटाळली होती.त्यात आंबेडकरी जनतेने काँग्रेसच्या पारड्यात संविधान बदलाच्या धाकाने एकगठ्ठा मते दिली.आणि वंचित ची मते कमालीची घटली.ज्यांनी वंचितला मते दिली नाही तेच विधानसभेच्या निवडणुकीदरम्यान वंचित ची टक्केवारी घटली, वंचित ची मते कमी झाली अशी बोंब ठोकू लागले . आणि लगोलग विधानसभा निवडणूक आली .लोकसभेला वंचितची घटलेली लोकप्रियता बघून काँग्रेसने आणि राष्ट्रवादी (महाविकास आघाडीने) वंचितला किंमत दिली नाही.तरी आंबेडकरांनी विधानसभा निवडणुकीत बऱ्यापैकी मते घेतली. पाच जागांवर वंचित चे उमेदवार आघाडीवर होते.ही मनसे पेक्षा मोठी प्रगती होती. पण ईव्हीएमच्या सपाट्यात काँग्रेस आणि काही संघटनांचा सफाया झाला. त्यातच वंचितच हे उमेदवार निवडून येऊ शकले नाही. यानिमित्ताने काँग्रेससाठी रिपब्लिकन जनतेची मते मागणाऱ्यांना प्रश्न विचारावेसे वाटतात. काँग्रेसला मते दिली नाही तर भाजप सत्तेत येईल,काँग्रेसला मत दिले नाही तर संविधान धोक्यातील वंचितला मत दिले तर,तुमचे मत वाया जाईल असे म्हणणाऱ्यांना आणि काँग्रेसला मते देणाऱ्यांना एकच सवाल आहे काँग्रेसचा दारुण पराभव झाला आता तुमची मते वाया गेली नाही का ? आंबेडकरी पक्षांनाच मते दिल्यानंतर तुमची मते वाया जातात का? आता काँग्रेसचे सरकार नाही तुमचं काही बिघडलं? आणि काँग्रेसचे सरकार असतं तर तुमचा काय फायदा झाला असता? सरकार कोणाचेही असो त्यात तुम्ही गुलाम आहात. इंजिनियर झालेले बौद्ध तरुण काँग्रेस भाजपमध्ये कामाला आहेत. काँग्रेस नेत्यांच्या भाजप नेत्यांच्या सेना नेत्यांच्या वाढदिवसाला विजयोत्सवाला हे इंजिनियर्स त्यांच्याबरोबर आपला फोटो टाकून शुभेच्छा देतात. तालुक्यात दोन-चार ग्रामपंचायती फिरतात.काँग्रेसच्या एखाद आमदाराचं नाव सांगतात. कुठल्यातरी बांधकामाची जाहिरात काढायला सांगतात तसा ठराव घ्यायला सांगतात .आणि ठेकेदारीचं काम मिळवून घेतात. त्या बदल्यात निवडणुकीत मग हे इंजिनियर काँग्रेससाठी मते मागतात. त्याहूनही मोठी शोकांतिका आहे, की काही शिक्षक प्राध्यापक नोकरीसाठी सवलत मिळवण्यासाठी बाबासाहेबांचं नाव घ्यावं लागतं. बढती मिळवण्यासाठी बाबासाहेबांचे नाव घ्यावं लागतं, स्कॉलरशिप मिळवण्यासाठी बाबासाहेबांचे नाव लागतं, नोकरी मिळते.रगड पगार मिळतो निवृत्तीनंतर रगड पैसाही मिळतो. आयुष्यभर काही ना काही मिळविण्यासाठी बाबासाहेबांचे नाव घेतात. सारी सुख उपभोगतात. नोकरी पैशामुळे मानसन्मान मिळवतात. तरी अशा भाडखाउंना शेवटी ही कसली उणीव जाणवते कुणास ठाऊक ! निवृत्तीनंतरही हे भाडखाउ समाधानी होत नाही यांना बाबासाहेबांची राजकीय चळवळ दिसत नाही. सारी हयात बाबासाहेबांचं नाव घेत सुख भोगणारे हे भाडखाउ निवृत्तीनंतर काँग्रेस राष्ट्रवादी, सेना भाजपमध्ये, दलित सेलचे जिल्हाध्यक्ष,शहराध्यक्ष, तालुकाध्यक्ष म्हणून चौकात बॅनर लावतात.सामाजिक कार्यक्रम करताना आनंदराज आंबेडकर,राजरत्न आंबेडकर,प्रकाश आंबेडकर,असे आंबेडकर घराण्याचे लोक बोलावणार.कारण त्यांच्या शिवाय पैसा जमत नाही.मते मात्र मागताना ते आंबेडकरांच्या पक्षाला मते मागत नाही. राजकारणासाठी आंबेडकरांचा पक्ष चालत नाही. ही वस्तुस्थिती आहे. ही वस्तुस्थिती अतिशय त्रासदायक आहे. बाबासाहेबांकडे किती दूरदृष्टी होती! ते म्हणाले होते, शिकले सवरलेले लोकच मला धोका देतील. आज ही सारी परिस्थिती बघितली की बाबासाहेबांचं म्हणणं किती अचूकपणे होतं याचा अंदाज येतो. थोडक्यात एवढंच सांगायचंय आंबेडकरी जनता म्हणजे सेल साठी, विक्रीसाठी ठेवलेली वस्तू नाही. आंबेडकरी चळवळीसाठी आपण तन, मन आणि धन कुर्बान केले पाहिजे. बाबासाहेबांचा हाच संदेश होता....

-------------

राजू बोरकर
७५०७०२५४६७
मु.पो.ता.लाखांदूर जि.भंडारा





## स्वानंद सार्वजनिक वाचनालयात स्टेट बँक ऑफ इंडियाचे शाखा व्यवस्थापक महेश गावकर यांचा सत्कार संपन्न.

केज/ प्रतिनिधी :-स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज. जि. बीड. येथे स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा धारूरचे शाखा व्यवस्थापक महेश माणीकराव आनंदगांवकर यांनी दिनांक १४ जानेवारी २०२५ रोजी सदिच्छा भेट दिली. यावेळी स्वानंद सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने त्यांचा शाल, पुष्पहार देवून ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, माजी प्राचार्य, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक वसुदेव( बप्पा) गायकवाड यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामीण भागात दर्जेदार व लोकाभिमुख गंथालय पाहून खुपच समाधान वाटल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी रविंद गायकवाड ( पेंटर ) यांनी प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन व्यक केले.

## सार्वजनिक बांधकाम मंडळाच्यावतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त विविध उपक्रम

लातूर, दि. १४ : मराठी भाषेचा प्रचार व प्रसार या शासन धोरणास अनुसरुन १४ ते २८ जानेवारी, २०२५ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा सार्वजनिक बांधकाम विभाग , जलसंपदा विभाग व मृद व जलसंधारण विभाग या तिन्ही विभागांच्या संयुक्त विद्यमाने साजरा केला जात आहे. या अंतर्गत विभागातील अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी सार्वजनिक बांधकाम मंडळ, बांधकाम भवन येथे १७ व १८ जानेवारी, २०२५ या कालावधीत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

१७ जानेवारी, २०२५ रोजी दुपारी ३ वाजतापासून स्पर्धेस सुरुवात होईल. निबंध स्पर्धा, कविता लेखन, हस्ताक्षर स्पर्धा, युनिक कोड लिपीत टंकलेखन करण्याची स्पर्धा, शुध्दलेखन स्पर्धा, इंग्रजी शब्दांचा मराठीत अनुवाद आदी स्पर्धा यावेळी होतील.
१८ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी १० वाजतापासून घोषवाक्य स्पर्धा, वादविवाद स्पर्धा , माझ्या आयुष्यातील संस्मरणीय घटना, कविता वाचन, अभिवाचन स्पर्धा, अंताक्षरी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.
लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळाचे अधीक्षक अभियंता डॉ.सलीम शेख यांनी तिन्ही विभागाच्या सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी कोणत्याही एका उपक्रमात सहभाग नोंदविण्याबाबत परिपत्रकान्वये आवाहन केले आहे.
तसेच या कालावधीत मराठी भाषा पुस्तक विक्रीचे स्टॉल (पुस्तक जत्रा) चे आयोजन करण्यात आलेले आहे.
स्पर्धेचा समारोप कार्यक्रम १८ जानेवारी, २०२५ रोजी दुपारी ४.३० वाजता लातूर शासकीय विश्रामगृह येथे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत होणार आहे. स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात येणार आहे.

# दातांचा सर्वात मोठा शत्रू कोण? चहा-कॉफी, कोल्ड ड्रिंक की रेड वाईन; डेंटिस्टने केला खुलासा



दातांचा सर्वात मोठा शत्रू कोण? चहा-कॉफी, कोल्ड ड्रिंक की रेड वाईन; डेंटिस्टने केला खुलासा

आपण आपल्या दैनंदिन जीवनात काही पेये पितो जी आपल्या दातांसाठी अजिबात चांगली नसतात आणि त्यांच्या सौंदर्यावर खोलवर डाग लावतात. पण नक्की चहा-कॉफी, कोल्ड ड्रिंक, रेड वाईन काय ठरते वाईट?

दातांवर सर्वाधिक कोणत्या पेयांचा परिणाम होतो

अमेरिकेतील कॅलिफोर्नियातील बेव्हरली हिल्स येथील दंतवैद्य डॉ. माइल्स मॅडिसन यांनी ४ लोकप्रिय पेयांपैकी कोणते - कॉफी, चहा, कोल्ड्रिंक्स किंवा रेड वाईन हे शोधण्यासाठी एक प्रयोग केला. हा पदार्थ दातांना सर्वात जास्त डाग देतो. डेली मेलच्या वृत्तानुसार, काढलेल्या दातांचा वापर करून, त्याने ते या पेयांमध्ये १० दिवस भिजवले आणि त्याचे निकाल टिकटॉकवर शेअर केले. त्याचे निकाल आश्चर्यकारक आणि चिंताजनक दोन्ही होते. काय निघाला निष्कर्ष आपण या लेखाच्या माध्यमातून जाणून घेऊया, जेणेकरून तुम्ही तुमच्या आयुष्यातून हे पेय काढून टाकण्यास मदत मिळेल (फोटो सौजन्य - )

कोणत्या ड्रिंकने दातावर पडतात डाग?

दातांवर डाग पाडणारे ड्रिंक

रेड वाईन हे सर्वात जास्त डाग देणारे पेय म्हणून या अभ्यासातून समोर आले आहे, ज्यामुळे दात पूर्णपणे जांभळे झाले, ज्यामुळे मुलामा चढवणे आणि मुळांवर परिणाम झाला. डॉ. मॅडिसन यांनी ते सर्वात विद्रूप करणारे पेय म्हणून वर्णन केले आहे. दातांना सर्वाधिक धोका या पेयामुळे होतो असंही या अभ्यासातून सांगण्यात आले आहे. कोल्ड्रिंक्सचा दातांवरही खोलवर परिणाम झाला, त्यामुळे दात काळे झालेच नाहीत तर त्यांच्या आम्लीय गुणधर्मांमुळे लहान पोकळ्याही निर्माण झाल्या, ज्यामुळे मुलामा चढवणे आणि मुळांची रचना खराब झाली.

चहा - कॉफीपैकी जास्त खराब काय?

चहा-कॉफीपैकी काय ठरते जास्त त्रासदायक

त्या तुलनेत कॉफीने चहापेक्षा जास्त दातांवर डाग लावले असल्याचे या अभ्यासात दिसून आले. परंतु कोल्ड्रिंक्स आणि रेड वाईनपेक्षा कमी असल्याचा फरकही जाणवला. कॉफीमुळे दाताचा वरचा भाग पिवळा आणि मूळ गडद तपकिरी होतो. कमी खनिज घटकांमुळे मुळांवर जास्त परिणाम झाला. चहावर सर्वात कमी डाग पडले, प्रामुख्याने मुळांवर हलका तपकिरी रंग होता

प्रयोगादरम्यान काय दिसले

हा प्रयोग जरी उदाहरणात्मक असला तरी, वास्तविक जीवनातील परिस्थितींची प्रतिकृती बनवत नाही, कारण वास्तविक जीवनात दात जास्त काळ या द्रवांमध्ये बुडवले जात नाहीत. तथापि, ते विशिष्ट पेयांच्या डाग पडण्याच्या क्षमतेकडे आणि धूम्रपानासारख्या सवयींच्या भूमिकेकडे लक्ष वेधतात.

दातांवरील डाग दूर करण्याचे उपाय

दातांवरील डाग कसे दूर करावे

बहुतेक डाग हे कॉस्मेटिक असतात आणि योग्य काळजी घेऊन दात काढून टाकता येतात. तथापि, दंतवैद्य आम्लयुक्त पेये किंवा अन्न खाल्ल्यानंतर लगेच दात घासण्याविरुद्ध इशारा देतात, कारण यामुळे मुलामा चढवणे कमकुवत होऊ शकते आणि त्याखालील पिवळा डेंटिन थर उघड होऊ शकतो. सतत पिवळेपणा येणे हे चुकीच्या ब्रशिंग सवयी किंवा इतर समस्यांचे लक्षण असू शकते.

किळसवाणे दिसतात पिवळे दात, ३ पदार्थांनी होतील हिऱ्यासारखे चमकदार

सोशल मीडियावरही प्रतिक्रिया

डॉ. मॅडिसन यांच्या व्हिडिओमुळे सोशल मीडियावर प्रतिक्रिया उमटल्या आहेत, अनेक लोकांनी धक्का बसल्याचे व्यक्त केले आहे आणि त्यांच्या पेयांच्या निवडींवर पुनर्विचार करण्याचे वचन दिले आहे. काही वापरकर्त्यांनी बिअर सारख्या पेयांची चाचणी घेण्याचा सल्ला दिला, जे दंतवैद्याने भविष्यातील प्रयोगांमध्ये ते एक्सप्लोर करू शकतात असे सूचित केले.

एकंदरीत, जरी हे प्रयोग काही पेयांचे डाग पडण्याचे परिणाम दर्शवित असले तरी, दंतवैद्य यावर भर देतात की दात तपकिरी होणे यासारख्या इतर लक्षणांसह नसल्यास डाग पडणे बहुतेक निरुपद्रवी असते, ज्यामुळे नसा प्रभावित होऊ शकतात. व्यावसायिक लक्ष देण्याची आवश्यकता असलेले नुकसान दर्शवू शकते.

टीप - हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य बदलानुसार वापर करावा.

## अतिक्रमणे काढल्याबद्दल मनपाचे कौतुक, अतिक्रमण पुन्हा होणार नाही याची मनपाने काळजी घ्यावी - हिंदुत्व जागर संघटना हिंदुत्व जागर संघटनेची मनपा आयुक्तांकडे मागणी



लातूर / प्रतिनिधी : शहरातील गोलाई येथील श्री जगदंबा देवी मंदिर लातूरकरांसाठी आराध्य दैवत आहे. वर्षभर तिथे भाविकांची वर्दळ असते. नवरात्रीमध्ये तर अभूतपूर्व अशी गर्दी असते. संपूर्ण गोलाईच्या परिसराला अतिक्रमणाचा विळखा होता, त्यामुळे महिलांना दर्शनाला जाण्यासाठी अंग चोरून गर्दीतून जावे लागत होते. तसेच गोलाईच्या परिसरामध्ये वाहतुकीला प्रचंड अडथळा होत होता. तिथले अतिक्रमण काढणे हे अत्यंत गरजेचे होते, महापालिका प्रशासनाने ते अतिक्रमण काढले त्याबद्दल त्याचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार, लातूरकरांच्या वतीने १४ जानेवारी रोजी हिंदुत्व जागर संघटनेने मनपा प्रशासनाला अभिनंदनाचे पत्र देऊन केले आहे.

त्यासोबतच हिंदुत्व जागर संघटनेने मनपा आयुक्तांकडे परत तिथे अतिक्रमण होणार नाही, तो परिसर असाच कायमस्वरूपी मोकळा राहावा याची काळजी घ्यावी, जे हातगाडीवाले व फुटपाथवर व्यवसाय करणारे विस्थापित झाले आहेत, त्यांना पर्यायी जागा देण्यापूर्वी ते परवाना धारक विक्रेते आहेत का तसेच लातूरचे किंवा भारताचे रहिवासी आहेत का अवैध घुसखोर आहेत याची शहानिशा करावी. जर कोणी पाकिस्तानी, बांगलादेशी, रोहिंग्या घुसखोर आढळून आला तर त्याच्यावर व त्याला सहकार्य करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करावी, अश्या स्वरूपाची मागणी निवेदनातून केली आहे. यावेळी हिंदुत्व जागर संघटनेचे अध्यक्ष मनोज सुर्यवंशी, उपाध्यक्ष संतोष तोष्णीवाल, सचिव शाम भराडिया, सहसचिव संतोष पांचाळ, कोषाध्यक्ष शिवकांत ब्रिजवासी, सदस्य व्यंकटेश कुलकर्णी, दिलीपचंद चोपडा, लक्ष्मीकांत कुलकर्णी, कन्हैयालाल जंत्रे, शामसुंदर मानधना, अलका शिंदे, रोहिणी ढगे, स्मिता ठाकूर, रविकिरण गिरी, मोहन समशेट्टे, मुंजाने निखिल, अरुण बिराजदार, शशिकांत हांडे उपस्थित होते.

## मनपा कंत्राटी सफाई व घंटागाडी कामगारांना कामगार कायद्याअंतर्गत सोयी सुविधा द्याव्यात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन.



लातूर –अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या वतीने संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर यांच्या नेतृत्वात लातूर शहर मनपा मध्ये घनकचरा व्यवस्थापनामध्ये काम करणाऱ्या घंटागाडी व कंत्राटी स्वच्छता कामगारांच्या विविध समस्या व कामगारांना कामगार कायद्याअंतर्गत वेतन सुविधा द्याव्यात यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटना शहर कमिटीचे शहराध्यक्ष विशाल काळे, शहर सचिव महेंद्र कांबळे, शहर उपाध्यक्ष ज्योती उपाडे, लहू जगताप, शहर सहसचिव सुधीर कांबळे, आयुब शेख, अंजनाताई सकट, शेख दस्तगीर,पंडित गायकवाड,परमेश्वर कांबळे, आदी सर्व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर कृउबा नवीन बाजारपेठ उभारणीसह एम.आय.डी.सी मधील सर्व प्रलंबित प्रश्न मार्गी लागणार उदयोग मंत्री ना. उदय सामंत समवेत

लातूर/ प्रतिनिधी :- लातूरच्या औदयोगिकरणाला अधिकची चालना मिळावी म्हणून औद्योगिक वसाहती मधील विविध प्रश्न मार्गी लागावेत या मागणीसाठी सोमवार, दि. १३ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री ना. श्री.उदयजी सामंत यांची राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मंत्रालयात भेट घेतली. विमानतळ विस्तारीकरण, कृषी उत्पन्न बाजार समितीची उभारणी, औद्योगिक वसाहत टप्पा क्रमांक ३ मंजुरी, व इतर काही विषयाच्या अनुषांगाने यावेळी सविस्तर सकारात्मक चर्चा झाली. मंत्रालय, मुंबईयेथे औद्योगिक वसाहती मधील विविध प्रश्न मार्गी लागावेत यासाठी महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री ना. श्री.उदयजी सामंत यांची राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मंत्रालयात भेट घेतली. लातूर एमआयडीसी अंतर्गत असलेल्या विमानतळाचे अंतिम टप्प्यात आलेले विस्तारीकरण थोडक्या जमिनीच्या अधिग्रहणाभावी थांबले आहे, ते अधिग्रहणकरून नाईट लॅंडिंग सुविधेसह विस्तारीकरण लवकर पूर्ण करावे, जेणेकरून या ठिकाणाहून प्रवासी तसेच कृषी मालाची व औद्योगिक उत्पादनांची मालवाहतूक सुरु होईल. त्याचबरोबर एअर अंबुलांसाठीही हे विमानतळ उपयुक्त ठरून, रुग्णांना चांगल्या रुग्णालयात तातडीचे उपचार घेता येतील, यातून हे शहर आरोग्य सेवेचे केंद्र म्हणून ही नावारूपाला येईल अशी चर्चा यावेळी झाली. जुन्या औदयोगिक वसाहतीमधील रस्ते खराब झाले आहेत तर नव्या औदयोगिक वसाहतीत आणखी काही ठिकाणी रस्ते बांधण्यात आलेले, काही प्लॉट साठी वीज व पाणीपुरवठ्याच्या व्यवस्था उभारणे आवश्यक आहे, या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, पर्यावरण रक्षणासाठी औदयोगिक वसाहती अंतर्गत नियमानुसार मोकळ्या जागा ठेवण्यात आलेले आहेत, तो हेतू साध्य करण्यासाठी त्या जागा सर्वसामान्यांच्या दृष्टीने मोकळ्याच ठेवण्यात याव्यात. लातूर कृषि उत्पन्न बाजार समितीसाठी अतिरीक्त औद्योगिक वसाहतीमध्ये मंजूर भूखंडावरील बांधकामास, प्रशासकीय व इतर कारणामुळे विलंब झाला आहे, त्यामुळे या बांधकामासाठी आता विना विलंबशुल्क मुदतवाढ देण्यात यावी. दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध होत असल्याने आता लातूरमध्ये काळानुरूप नव्या कल्पना घेऊन उद्योग उभारणीसाठी तरुण पिढी तयार आहे, त्यांच्या उद्योग उभारणीच्या संकल्पना पूर्ण करण्यासाठी त्यांना भूखंड उपलब्ध करून देणे आवश्यक आहे त्यामुळे लातूर औदयोगिक वसाहती मधील टप्पा क्रमांक ३ साठी त्वरित मंजुरी देण्यात यावी. औदयोगिक वसाहतीमधील जुन्या जीर्ण झालेल्या विश्रामगृहाची आवश्यकतेनुसार पुनर्बांधणी किंवा नूतनीकरण करण्यात यावे. या सर्व मागण्यांसह लातूर येथील औद्योगिक विस्ताराच्या दृष्टीने या भेटीत विषयनिहाय महोदयानी सकारात्मक चर्चा केली, सर्व विषय मार्गी लावण्याचे आश्वासन दिले, या विषयावर लवकरात लवकर निर्णय होण्याच्या दृष्टीने संबंधित अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक बोलवण्याची राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची विनंतीही त्यांनी मान्य केली आहे. यावेळी सभापती जगदीश बावणे व सचीव अरवींद पाटील उपस्थित होते.



# वाल्मिक कराडला खंडणी प्रकरणी १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील मस्साजोग येथील आवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांना २ कोटी रुपयाची खंडणी मागून त्यांना धमकी दिल्या प्रकरणात १५ दिवसांच्या पोलीस कोठडीत आसलेल्या वाल्मिक कराडला मंगळवारी दुपारी केज येथील न्यायालयात हजर केले आसता, न्यायालयीन कोठडी मिळण्या आधीच वाल्मिक कराड याला मकोका लावण्यात आला आहे. त्यामूळे पुढील तपास करण्यासाठी त्याला आमच्या ताब्यात देण्यात यावे. असा अर्ज एस आय टी च्या अधिकाऱ्यांनी केज न्यायलाकडे केला. याला न्यायालयाने परवानगी दिल्या मूळे वाल्मिक कराडच्या अडचणी वाढल्या आहेत. मस्साजोग येथील आवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांना २ कोटीची खंडणी मागून जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी वाल्मिक कराड, विष्णू चाटे व सुदर्शन घुले या तिघांविरुद्ध प्रकल्प अधिकारी सुनील केदु शिंदे यांच्या फिर्यादीवरून ११ डिसेंबर रोजी खंडणीचा गुन्हा नोंद झाला होता.यातील आरोपी विष्णू चाटेला १८ डिसेंबर रोजी बीड जवळ लक्ष्मी चौकात अटक केली होती तर वाल्मिक कराड चे १०० बँक खाते गोठविल्या नंतर त्याची नाकेबंदी झाल्यामुळे तो पुण्यातील पाषाण परिसरातील सीआयडी च्या कार्यालयात ३१ डिसेंबर रोजी सकाळी शरण आला होता. त्याच दिवशी रात्री ११-३० वाजता त्याला केज न्यायालयात हजर केले आसता केज न्यायालयच्या मुख्य न्यायाधीश एस.व्ही.पावसकर यांनी त्याला १५ जानेवारी पर्यंत एकूण १५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. दरम्यान मंगळवारी त्याच्या पोलीस कोठडीची मुदत संपल्यामुळे त्याला दुपारी केज न्यायालयात हजर केले आसता या प्रकरणी शासनाने नियुक्त केलेले माजलगाव येथील सरकारी वकील ड.जितेंद्र शिंदे यांनी त्याला आणखीन १० दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली होती. त्याला आक्षेप नोंदवित आरोपीचे वकील ड.सिद्धेश्वर ठोंबरे यांनी कराड स्वतः होऊन पोलिसांना शरण आला आहे. १५ दिवसांची पोलीस कोठडी त्याला देण्यात आली होती. आता त्याला पोलीस कोठडीची गरज नसल्याचे न्यायालयच्या निदर्शनास आणून दिले. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकून न्यायाधीश निशांत गोळे यांनी वाल्मिक कराड याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. वाल्मिक कराड याला मंगळवारी १२-१९ वाजता केज न्यायालयात हजर केले होते. ४-१७ वाजता त्याला बीड येथील कारागृहकडे पोलीस घेऊन गेले. वाल्मिक कराड याला न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावताच त्याला जामीन मिळावी यासाठी लागलीच न्यायालयात अर्ज दाखल केला असल्याची माहिती आरोपीचे वकील ड. सिद्धेश्वर ठोंबरे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली. यासंबधीचा निर्णय चार दिवसात अपेक्षित असल्याचेही त्यांनी सांगितले.तर सरकारी पक्षाच्या वतीने माजलगावचे सरकारी वकील ड. जितेंद्र शिंदे यांनी अतिशय प्रभावी पणे बाजू मांडून १० दिवसांच्या वाढीव पोलीस कोठडीची मागणी केली. यावेळी १३ मुद्दे मांडून वाल्मिक कराड याने त्याची संपत्ती कोणा, कोणाच्या नावावर केली आहे. हे तपासण्यासाठी व त्याने परदेशात काही गुंतवणूक केली आहे का? वाल्मीक कराडचा सरपंच संतोष देशमुख हत्ये प्रकरणात सहभाग आहे का? या साठी सुदर्शन घुले आणि वाल्मिक कराड या दोघांचीही एकत्र चौकशी करायची असल्यामुळे वाल्मिक कराड याला १० दिवसांची वाढीव पोलीस कोठडी देण्यात यावी असा युक्तीवाद ॲड जितेंद्र शिंदे यांनी न्यायालयात केला. आरोपी वाल्मिक कराड याच्या वतीने युक्तिवाद करताना ॲड सिद्धेश्वर ठोंबरे यांनी सरकारी वकिलांनी मांडलेले सर्व मुद्दे खोडले. वाल्मिक कराडला पोलिसांनी अटक केली नाही. तो स्वता शरण आला. पोलीस कोठडीत त्याने तपासकामी सहकार्य केले आहे.आरोपी वाल्मिक कराड याच्या वतीने

-
सुदर्शन घुले आणि वाल्मिक कराड यांची न्यायालयीन कोठडीत आसताना ऐकत्रित पणे चौकशी करता येऊ शकते.

-२९ नोव्हेंबर रोजी धमकी दिल्याचा वाल्मिक कराड विरुद्ध गुन्हा नोंद नाही

- वाल्मिक कराडचे सर्व बँक खाते गोठविण्यात आले आहेत. सरपंच हत्येच्या गुन्ह्यात आरोपी नाही. १५ दिवसापेक्षा जास्त पोलीस कोठडी देता येत नाही,कर्नाटक उच्च न्यायालयच्या निर्णयाचा पुरावा सादर. याप्रमाणे ड. सिद्धेश्वर ठोंबरे यांनी प्रभावी पणे युक्तीवाद केला. तो न्यायालयाने मान्य करून १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी दिली.




# पँथर पुनर्जीवित होणे काळाची गरज: प्रा. यु.डी.गायकवाड



लातूर: सध्याची राजकीय आणि सामाजिक परिस्थिती पाहता पुन्हा मनुवाद येत असल्याचे जाणवत आहे. त्यामुळे पुन्हा दलित पँथर पुनर्जीवित होण्याची काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्रा. यु. डी.गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते बापू घोलप होते. प्रकाश नगरमधील नालंदा बुद्ध विहारांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा करण्यात आला. यावेळी गायकवाड बोलत होते. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बुद्धाच्या प्रतिमेचे पूजन करून त्रिशरण पंचशील घेण्यात आले. नामांतर चळवळीमध्ये शहीद झालेले पोचिराम कांबळे, जनार्धन मेवाडे, गोविंद भुरेवार, दिलीप रामटेके, चंदर कांबळे, विलास ढाणे, नारायण गायकवाड, शरद पाटोळे, रोशन बोरकर, सुहासिनी बनसोडे, प्रतिभा तायडे, अविनाश डोंगरे, विलास घोगरे, गौतम वाघमारे या शहिद वीर भीमसैनिकांना अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा. यु. डी.गायकवाड यांनी दलित पँथर व नामांतर लढ्याचा रक्तरंजित इतिहास सांगितला. याप्रसंगी माजी समाज कल्याण माजी सभापती बालाजी कांबळे, महाराष्ट्र विकास आघाडीचे बसवंतप्पा उबाळे यांची यथोचित भाषणे झाली. कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा परिषदेचे माजी समाज कल्याण सभापती बाबासाहेब गायकवाड, नालंदा विहाराचे अध्यक्ष उत्तमराव कांबळे, सचिव बाबुराव बनसोडे, ज्ञानोबा सुरवसे, सुरेश सोनकांबळे, मधुकर श्रगारे, माजी नगरसेवक नागसेन कामेगावकर, अरुण गायकवाड, मारुती आपटे, सामाजिक कार्यकर्ते रणजीत कांबळे, उत्तम कांबळे आदी उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE